साक्षीदार क्र ०२ ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–आयुश सुर्यभान मडावी
वय २१ वर्ष, व्यवसाय–शेती
राह.मुरादपुर, ता.उमरेड, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत**

१. घटना ही सन २०२२ मध्ये घडली होती. घटनेच्या दिवशी मी बेला येथुन मुरादपुर या गावी जाण्यासाठी बाईकवर निघालो होतो. त्यावेळी मी माझ्या बाजुने जात असतांना समोरून आरोपीची गाडी घेउन आरोपी आला व माझ्या गाडीला येउन धडकला. त्यानंतर मी माझ्या गाडीवरून पडलो व बेहोश झालो. सदर अपघातामध्ये माझ्या डोक्याला व भुवईला लागले होते. समोरून येणारी गाडी ही फास्ट होती. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. मला ज्या गाडीचालकाने धडक दिली त्या गाडीचालकाला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आरोपीच्या गैरहजेरीचा अर्ज नि.क्र.१६ वर दाखल, मंजुर, ओळखीबाबत तक्रार नाही.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.पी.एच.रघुते यांच्यामार्फत उलटतपास सुरू.**

२. हे म्हणणे खरे नाही की, ज्या ठिकाणी अपघात झाला होता त्या ठिकाणी एका बाजुला सिमेंट रोडचे काम झाले होते व दुस–या बाजुच्या सिमेंट रोडचे काम चालु होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर रोडवर सिमेंट रोडचे काम चालु होते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सिमेंट रोडचे काम समोर चालू होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी सिमेंट रोडचे काम समोर चालु होते त्या ठिकाणी गिट्टी, रेती इ. साहित्य पडलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, ज्या ठिकाणी अपघात झाला त्या ठिकाणी एका बाजुने तयार झालेल्या सिमेंटच्या रोडवर येणा–या व जाणा–या वाहणांची ये–जा सुरू होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनेची वेळ रात्रीची होती. हे म्हणणे खरे आहे की, रात्रीची वेळी असल्याने कोणत्या वाहणाने धडक दिली हे मला माहित नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मला बाईकने धडक दिली होती याबाबत माहित आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्याठिकाणी मी अपघात होउन पडलो होतो त्या ठिकाणच्या रोडचे एका बाजुचे बांधकाम व्हायचे बाकी होते. हे म्हणणे खरे नाही की,

ज्या ठिकाणी अपघात झाला होता त्या ठिकाणी रेती व बांधकामाचे साहित्य पडलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर असलेल्या रोडच्या बांधकामाच्या साहित्याला मी धडकलो व माझी गाडी खाली पडली. हे म्हणणे खरे नाही की, समोरून येणारे वाहण जोरात येत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१८.०८.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड